NAAC A ++ Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## प्रवेश सूचना
## पीएच. डी. प्रवेश २०२२-२३

युजीसी नवी दिल्ली यांनी संदर्भ क्रं. **No. F. No. 1-3/2021 (QIP) dated 17.03.2022** रोजीच्या पब्लिक नोटिसीद्वारे **University Grants Commission (Minimum Standards and Procedures for Award of Ph.D. Degree) Regulations, 2022.** प्रसिध्द केले आहे.

त्यामध्ये खालील बाब नमूद करण्यात आली आहे.

**12. De-specification of M.Phil. Degree : The M. Phil. (Master of Philosophy) degree shall be de-specified from the Academic year 2022-23 onwards. M.Phil. Degree awarded till the date of notification of these regulations shall remain valid.**

उपरोक्त अनुषंगाने कळविण्यात येते की, एम.फिल. अभ्यासक्रमाबाबत, युजीसी यांचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर सर्व संबंधीतांना त्यानुसार सुचित करण्यात येईल.

शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागणी करणेत येत आहेत. सदर प्रवेश परीक्षेची सविस्तर माहिती, ऑनलाईन अर्ज प्रक्रिया, प्रवेश क्षमता, परीक्षा केंद्र आणि पीएच. डी. नियमावली यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळारील Ph.D. Admission 2022-23 या लिंकवर भेट द्यावी. सदर प्रवेश प्रक्रिया **University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of M.Phil/Ph.D Degrees) Regulations, 2016. and the amendments there upon from time to time.** नुसार राबविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना खाली दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. भरलेल्या अर्जामध्ये काही दुरूस्त्या असतील तर त्या mphilphd@unishivaji.ac.in या ईमेलवर दि. **२६/०७/२०२२** पूर्वी कळवाव्यात, त्यानंतर प्राप्त झालेल्या दुरूस्त्यांचा विचार केला जाणार नाही.

१. ऑनलाईन अर्ज दि. ०८/०७/२०२२ दु. १२.०० वा. पासून ते दि. २४/०७/२०२२ या कालावधीत मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील.
२. **प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक व परीक्षा प्रवेश पत्र डाऊनलोडिंग करीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नंतर उपलब्ध करण्यात येईल.**
३. **पीएच.डी. प्रवेश परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन स्वरूपात आयोजित केली जाईल. याबाबत सूचना वेळोवेळी विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केल्या जातील. तेव्हा विद्यार्थ्यांनी अर्ज भरत असताना ऑफलाईन स्वरूपाच्या परीक्षेसाठी सांगली, सातारा व कोल्हापूर यापैकी एका परीक्षा केंद्राचा पर्याय निवडावा.**

**महत्वाच्या सूचना :-**

१. विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा सूचना, नियम व मार्गदर्शक तत्त्वे आणि माहितीपुस्तकातील विद्यापीठ नियमावली इत्यादींचे काळजीपूर्वक वाचन करून समजून घ्याव्यात.
२. पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेसाठी शिवाजी विद्यापीठाद्वारे 'प्रवेश परीक्षा' आयोजित करण्यात येईल. परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेचे निकष लागू नाहीत. (कृपया R.R.D. 4.4 पहावे.)
३. परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत सविस्तर माहिती पीएच.डी. माहितीपुस्तिका २०२२.२३ मधील प्रपत्र- २ मध्ये नमूद केलेली आहे.
४. महाराष्ट्र शासनाच्या आरक्षणविषयक धोरणातील नियम व तरतुदींची अंमलबजावणी करण्यात येईल.
५. विद्यार्थ्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय व प्रवर्गनिहाय उपलब्ध प्रवेश क्षमता तपासून पहावी. **(विषयनिहाय व प्रवर्ग निहाय प्रवेश क्षमता, प्रवेश सुचनेनुसार स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात आलेली आहे.)**
६. या सूचना पत्रासोबत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयनिहाय प्रवेश क्षमतेमध्ये बदल होऊ शकतो याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
७. पीएच. डी. प्रवेशासाठीची गुणवत्ता यादी या अभ्यासक्रमासाठी विहीत करण्यात आलेले नियम व पात्रता निकषाच्या आधारे तयार करण्यात येईल.
८. ऑनलाईन अर्ज **http://www.unishivaji.ac.in/online_portal/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
९. विद्यार्थ्यांनी ऑनलाईनरीत्या भरलेल्या अर्जाची छापील प्रत विद्यापीठास जमा करण्याची आवश्यकता नाही. तथापि, विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जाची छापील प्रत काढून स्वतःच्या माहितीसाठी ठेवावी.
१०. पीएच. डी. प्रवेश परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ८५०/- रूपये व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी ६००/- रूपये शुल्क असेल. हे शुल्क ना परतावा आहे.
११. प्रवेश परीक्षा शुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवे सुविधाद्वारे भरणा करता येईल.
१२. प्रवेश परीक्षा अर्ज प्रवेश परीक्षा शुल्क भरणा झाल्याची खात्री झाल्यानंतरच ग्राह्य धरण्यात येईल.
१३. प्रवेश पात्रतेच्या अटींच्या अधिन राहून ज्या विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक विषयांच्या प्रवेश परीक्षेकरिता अर्ज करावयाचा आहे, त्यांचेकरिता एकाच अर्जात एकापेक्षा अधिक विषयांसाठी प्रवेश परीक्षेचे अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. परंतु अशा विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र परीक्षा शुल्क भरावे लागेल.
१४. पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Ph.D. Admission 2022-23 या लिंकवर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रियेसंबंधीच्या अद्यावत माहितीसाठी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळास भेट द्यावी.
१५. प्रवेश परीक्षा ही पीएच. डी. अभ्यासक्रम प्रवेशासाठीची पात्रता परीक्षा असेल. सदर प्रवेश परीक्षा १०० गुणांची असेल. प्रत्येकी दोन गुणांचे ५० बहुपर्यायी प्रश्न असतील. प्रवेश परीक्षेमध्ये पात्र होणेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना कमीत कमी ५० गुण व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना ४५ गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. (चूकीच्या उत्तरास गुण कपात करण्यात येणार नाहीत.)
१६. सामान्य प्रवेश परीक्षेमध्ये संशोधन पध्दतीवर आधारीत प्रश्नांचा (५० गुणांसाठी) आणि संबंधित विषयावर आधारीत प्रश्नांचा (५० गुणांसाठी) समावेश असेल. प्रवेश परीक्षा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेल्या केंद्रावर आयोजित करण्यात येईल. प्रवेश परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Academic Tab मध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे.
१७. अर्ज भरताना तांत्रिक अडचणी आल्यास सदर अर्जाबाबत संगणक केंद्राच्या ०२३१-२६०९०९६ तसेच अन्य माहितीकरिता विद्यापीठाच्या पी.जी. बीयुटीआर विभागातील ०२३१-२६०९१३९ या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा **mphilphd@unishivaji.ac.in** या मेलवर कळविण्यात यावे.

स्थळ- कोल्हापूर
**दिनाक.** ०८/०७/२०२२

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**प्रभारी कुलसचिव**